सन २०२६-२७ या वित्तीय वर्षाकरिता महाराष्ट्र राज्य समाजकल्याण बोर्डास निवृत्तीवेतन व वेतनेतर बाबींसाठी निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांक-सकबो-२०२६/प्र.क्र.४० (ई-१६२८२४८)/का-१०

नविन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक-१८ ऑगस्ट, २०२६.

संदर्भ :-

१. महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.मबाआ-२०१९/प्र.क्र.१३ (ई-५१७८९४)/का-०७, दि.१०.०४.२०२६,

२. महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.सकबो-२०२६/प्र.क्र.४० (ई-१६२८२४८)/का-१०, दि.११.०५.२०२६.

प्रस्तावना :-

सन २०२६-२७ या वित्तीय वर्षाकरिता महाराष्ट्र राज्य समाजकल्याण बोर्डातील योजना व मुख्यालयातील निवृत्तीवेतन धारकांच्या निवृत्तीवेतनावरील खर्चासाठी व वेतनेतर बाबींवरील खर्चासाठी ₹३८७.५० लक्ष (अक्षरी रुपये तीन कोटी सत्त्याऐंशी लक्ष पन्नास हजार फक्त) इतका निधी महाराष्ट्र राज्य समाजकल्याण बोर्डास संदर्भाधीन क्र.२ येथील दि.११.०५.२०२६ च्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र.२ येथे “सदर निधीसाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई उपनगर हे आहरण व संवितरण अधिकारी तथा नियंत्रक अधिकारी राहतील,” असे नमूद करण्यात आले आहे. तथापि, महिला व बाल विकास विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील क्षेत्रिय कार्यालयांचा सुधारित आकृतीबंध संदर्भाधीन क्र.१ येथील दि.१०.०४.२०२६ च्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य समाज कल्याण बोर्ड बंद केल्यामुळे रद्द झालेली पदे वगळून सध्या मुख्यालयात कार्यरत असलेल्या १५ कर्मचाऱ्यांचे व प्रतिनियुक्तीवर असलेल्या ३२ कार्यरत योजना कर्मचाऱ्यांचे आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांच्या अधिनस्त कार्यालयातील नियमित पदांतील समकक्ष वेतन असणाऱ्या रिक्त पदांवर समायोजन करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य समाजकल्याण बोर्डातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतन अदा करण्यासाठी संदर्भाधीन क्र.२ येथील दि.११.०५.२०२६ च्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन शुध्दीपत्रक:-

संदर्भाधीन क्र.२ येथील दि.११.०५.२०२६ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.२ वगळण्यात येत असून सदर परिच्छेदाऐवजी पुढील परिच्छेद समाविष्ट करण्यात येत आहे :-

"सदर निधीसाठी "नियंत्रक अधिकारी" म्हणून आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे हे राहतील. त्यांचेकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे. तसेच, सदर निधी वितरीत करण्यासाठी लेखाधिकारी, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापाल कार्यालयास व शासनास सादर करण्याची दक्षता आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांनी घ्यावी. सदर निधी खर्च करतांना महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका व वित्तीय अधिकार नियम पुस्तिकेमध्ये उल्लेख केलेल्या तसेच नियोजन व वित्त विभागाने यापूर्वी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना व प्रचलित निकष, वित्तीय अधिकारांचे प्रत्यायोजन तसेच वित्त विभागाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. त्याचप्रमाणे विहीत कार्यपध्दतीनुसार निधी खर्च करण्यात यावा."

२. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०२६०८१८१७४८४६५३३० असा आहे. हे शासन शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUNIL DEORAO SARDAR

Digitally signed by SUNIL DEORAO SARDAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=c0098eb68042c66b72115bc62ef9206ece42981aab126657128d7cadca447533, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=778B75C2C14BADBE6832D77601CF425AA7979B907650965C83919DBA7DC458C7, cn=SUNIL DEORAO SARDAR
Date: 2026.08.18 18:01:20 +05'30'

(सुनिल सरदार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२. लेखाधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे,
३. महालेखापाल- महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर,
४. महालेखापाल- महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर,
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
६. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
७. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई उपनगर,
८. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०. कक्ष अधिकारी (का-४), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
११. निवड नस्ती, का-१०.